

अभिरुची
२०२६, अंक #१
Happy Easter!
Happy Womens Day!
Kavita Ketkar

# सॅक्रमेंटो महाराष्ट्र मंडळ

मराठी संस्कृतीचा सुगंध

—

ऋतू बदलतात, कथा नव्याने उमलतात

—

शब्दांच्या आणि चित्रांच्या प्रवासात आपलं स्वागत!

—

संपादिका
स्मिता कुलकर्णी

smita.kulkarni@comcast.net

मे २०२६

| | | |
|---|---|---|
| संपादकीय........................................................................................................ | स्मिता कुलकर्णी | 4 |
| अध्यक्षीय ........................................................................................................ | संदेश मालपुरे | 6 |
| माय मराठी माझी, परंतु... .................................................................................. | अविनाश चिकटे | 7 |
| शिवजयंती शब्दकोडे ........................................................................................ | साहिल आणि विवान शेंडे | 10 |
| माझे प्रभावशाली वडील .................................................................................... | संदेश मालपुरे | 11 |
| चित्रकाराच्या दुनियेत: वॉटरलिली ...................................................................... | राजस चित्रे | 12 |
| “आईये मेहरबान, बैठिये जानेजा” ... ............................................................... | स्मिता कुलकर्णी | 13 |
| अपूर्णांक (खास कलाकारांसाठी) ........................................................................ | सौ. विनया फणसळकर | 15 |
| चित्रकाराच्या दुनियेत: समुद्राजवळ फुललेला वसंत ........................................... | राजस चित्रे | 16 |
| शक्ती- एक शोध, एक आव्हान ........................................................................ | अमिता खरे | 17 |
| कुपमन्डूका, आहे का तुझी तयारी? ................................................................... | अजित नातू | 19 |
| क्षण टिपलेले, शब्दांत उलगडलेले .................................................................... | शशांक जोशी | 20 |
| चित्रकाराच्या दुनियेत: माउंट फुजीवरचा वसंत ऋतू.......................................... | राजस चित्रे | 22 |
| वाचाल तर वाचाल!! ......................................................................................... | मीनल जोशी | 23 |
| क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम: हसत टोचणारा सुखद अनुभव ................ | अविनाश चिकटे | 24 |
| मंडळाचे प्रायोजक ........................................................................................... | ...................................... | 26 |


*प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक आणि मंडळ सहमत असेलच असे नाही.
*लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे आहेत.

# संपादकीय

**नमस्कार मंडळी!**
या वर्षीचा अभिरुचीचा पहिला अंक महाराष्ट्र दिनाच्या शुभदिनी तुमच्या संगणक आणि भ्रमरध्वनीच्या पडद्यावर सादर करताना मला अपार आनंद होत आहे! तुम्हा सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! आणि हो, कामगार दिनाच्याही!

**अभिरुचीचा** नेमका अर्थ काय? या शब्दाची फोड केली तर त्याचे दोन शब्द होतात; अभि आणि रुची. अभि म्हणजे विशेष, अधिक, उत्कट आणि रुची म्हणजे आवड, रस, रसिकता. त्यामुळे "अभिरुची" म्हणजे एखाद्या गोष्टीकडे पाहण्याची कलात्मक, सुसंस्कृत, सौंदर्यदृष्टी असलेली आवड, रसिकतेने जगाकडे पाहण्याची वृत्ती. म्हणूनच अभिरुची हे नाव आपल्या या मासिकासाठी अत्यंत अर्थपूर्ण आहे, कारण ते संस्कृती, साहित्य, कला, आणि निसर्ग अशा सर्व क्षेत्रांतील सुंदर, निवडक, मनाला भिडणारं काहीतरी वाचकांसमोर आणणार आहे.

२७ फेब्रुवारी रोजी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी आणि नाटककार विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनानिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिवशी मराठी भाषेला अधिकृत राजभाषेचा दर्जा मिळाल्याने, १ मे हा 'मराठी राजभाषा दिन' म्हणूनही साजरा केला जातो. मराठी राजभाषा दिन आणि मराठी भाषा गौरव दिन हे दोन्ही मराठी भाषेचा सन्मान करणारे महत्त्वाचे दिवस आहेत.
भारतीय वायुसेनेतील मिग-२१चे निवृत्त फायटर पायलट व विंग कमांडर, तसेच स्पाईस एअर आणि अकासा एअरमध्ये प्रमुख कप्तान पायलट म्हणून दीर्घ सेवा बजावून अलीकडेच निवृत्त झालेले माझे मेहुणे अविनाश चिकटे, यांनी मराठी गौरव दिनानिमित्त लिहलेला मार्मिक लेख आणि कविता या अंकात समाविष्ट केली आहेत. त्यांच्या लेखनातील प्रश्न, निरीक्षणं आणि संवेदनशीलता नक्कीच वाचकांच्या मनात विचारांची नवी खिडकी उघडतील. याच विषयाला स्पर्श करणाऱ्या त्यांच्या "क्रांतिज्योती विद्यालय: मराठी माध्यम" या मराठी चित्रपटावरील परीक्षणातून मराठी समाजातील प्रश्नांच्या अनेक पैलूंवर नवा प्रकाश पडेल.

शिवजयंती साजरी केल्यानंतर सुचलेलं एक छान शब्दकोडं आपल्यातील छोटे कलाकार साहिल आणि विवान शेंडे यांनी तयार केलं आहे. ते नक्की सोडवून पहा. साहिल आणि विवान शेंडे यांच्या आजी, विनया फणसळकर यांनी भारतातून एक खूप छान कविता आपल्या मासिकासाठी पाठवली आहे. कुठलीही कला जोपासायची म्हणजे तिच्या प्राप्तीसाठी होणारे कष्ट आणि प्रयत्न सुद्धा आपल्याला किती सारं शिकवून जातात असं विनायाताई आपल्या कवितेतून दाखवून देतात. कलेत कधीच अंतिम उत्तर नसतं; असतो तो सतत चालणारा शोध.

ॲक्रिलिक चित्रकार राजस चित्रे यांचाही आपल्या मासिकाला सजवण्यात मोलाचा हातभार लाभला आहे. वसंत ऋतूत निसर्गाने उधळलेल्या रंगांची किमया त्यांच्या कलेतून सुंदरपणे दिसते.

मंडळातील अनेक महिला सभासदांनी इंटरनॅशनल विमेन्स डे उत्साहात साजरा केला असेल. अमिता खरेने सुरू केलेल्या "शक्ती" उपक्रमा मागची तिची प्रेरणा आणि त्या मागचा उद्देश काय आहे हे जाणून घेण्यासाठी तिचा लेख नक्की वाचा.

आपले अध्यक्ष संदेश मालपुरे यांनी त्यांच्या पूज्य पिताजींवर लिहिलेला लेख वाचताना जाणवते की मोठी स्वप्ने बाळगून त्यासाठी मनापासून परिश्रम करण्याची तयारी असेल, तर अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टीही साध्य करता येतात. अजित नातूं आपल्या कवितेतून हाच संदेश प्रभावीपणे व्यक्त करतात.

मंडळाच्या स्थापनेनंतर 'अभिरुची' मासिकाची पहिली वीट रचणारे अजित नातू यांच्या कवितेत एक महत्त्वाची जाणीव उमटते की स्वतःच्या छोट्या कोशात बंदिस्त राहिलं, तर बाहेरचं जग न दिसल्याने दृष्टी आणि दृष्टिकोन संकुचित होत जाते.

कविता केतकर-जोशीचे वडील, शशांक जोशी यांनी स्वतः टिपलेल्या निसर्गचित्रांचे केलेले अतिशय चपखल शब्दांकन  तुम्हाला नक्कीच आवडेल.

मराठी वाचनाची आवड असणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी! मंडळातर्फे सुरू होणाऱ्या मराठी ग्रंथालयाबद्दलची सविस्तर माहिती तुम्हाला मीनल जोशी यांच्या लेखातून वाचायला मिळेल.

या अंकाचे मुखपृष्ठ कोणी तयार केले आहे, हे लक्षात येताच तुम्हा सर्वांच्या चेहऱ्यावर हसू आलंच असेल! ती आहे आपलीच प्रतिभावंत कलाकार आणि मराठी शाळेची उत्साही शिक्षिका, कविता जोशी-केतकर. आपण या अंकासाठी निवडलेल्या विषयाला तिने दिलेला प्रतिसाद अगदी परिपूर्ण आणि अप्रतिम आहे! तिच्या या चित्रात जानेवारी ते एप्रिल दरम्यान महाराष्ट्रात साजरे होणारे सण आणि आपण आजच्या जागतिक जीवनशैलीत त्या दरम्यान साजरे करत असलेले विविध दिवस यांचा रंगतदार संगम इतक्या सुंदरपणे दिसतो की प्रत्येक वाचकाला 'वा!' म्हणावंसंच वाटेल. इतकं सुंदर आणि समर्पक मुखपृष्ठ साकारल्याबद्दल कविताचे मनःपूर्वक आभार!

आता तुमचं काम म्हणजे कविताने चित्रित केलेले सण ओळखून दाखवा! आणि चित्र आवडलं असेल तर आम्हाला नक्की कळवा; तुमचा प्रतिसाद आम्हाला वाचायला आवडेल.

मासिकासाठी वेळ काढून आपला हातभार लावून हा अंक सुंदर करणाऱ्या सर्व कलाकारांना मनःपूर्वक धन्यवाद आणि सर्व रसिक वाचकांना हार्दिक शुभेच्छा. संपादक म्हणून ही माझी पहिलीच वेळ असल्यामुळे या अंकाबद्दल वाचकांचा प्रतिसाद, सूचना आणि पुढील अंकासाठी लिहलेले साहित्य वाचायला मला नक्कीच आवडेल.

**स्मिता कुलकर्णी**

**मंडळीनो,**

२०२६ चे हे वर्ष आपल्या होळीच्या सुंदर कार्यक्रमाने अत्यंत उत्साहात सुरू झाले, आणि त्यानंतरचा हा प्रवास आणखी रंगदार होत चालला आहे.

मे महिन्यामध्ये क्रीडा दिन, रक्तदान शिबिर असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. सर्वांनी या कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपस्थित राहावे, ही नम्र विनंती. मुलांच्या सुट्ट्या चालू झाल्या की लगेचच कॅम्पिंगचे आयोजन केलेले आहे. ते खूप रोमांचकारी नक्कीच ठरेल. निसर्गाची विविधता अनुभवण्यासाठी आपण याल अशी आशा.

या वर्षी आपण अनेक नवीन आणि अर्थपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे आपल्या सदस्यांसाठी आयोजित केलेले रक्तदान  शिबिर. याला मिळालेला उत्कृष्ट प्रतिसाद खरोखरच कौतुकास्पद आहे. त्याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.

तसेच, 'अभिरुचीचा' अंक या वर्षी दोनदा प्रकाशित करण्याचा आपला मानस आहे. यासाठी स्मिताताईंनी घेतलेले परिश्रम आणि त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे—त्यांचे विशेष आभार.

आणखी एक नवीन उपक्रम म्हणजे आपण सुरू करत आहोत - मराठी ग्रंथालय.  यात अशा अनेक पुस्तकांचा समावेश असेल जी इथे सहज उपलब्ध नसतात. आपल्या सर्व सदस्यांना ही पुस्तकं सहज उपलब्ध व्हावी, यासाठी मंडळ प्रयत्नशील राहील. तुमच्याकडे जर काही पुस्तकं असतील, तर ती तुम्ही नक्कीच दान करू शकता. या ग्रंथालयाचा लाभ घ्या, उत्तम वाचनाचा आनंद घ्या, आणि त्यातून प्रेरणा घेऊन 'अभिरुची' साठी अधिक लेखन करा. आपले अनुभव सर्वांना पोहचण्यासाठी आपले शब्दपैलू किती प्रभावी आहेत हे बघा, आपण जे पुस्तक वाचत असाल त्याचा अभिप्राय व्यक्त करा आणी मराठीचा बाणा अभिमानाने वाहा.

आपल्या सर्वांच्या सहभागाने आणि सहकार्याने हे वर्ष अधिक समृद्ध आणि यशस्वी होईल, याची मला खात्री आहे. धन्यवाद!

**संदेश मालपुरे**
अध्यक्ष
सॅकर्यामेंटो महाराष्ट्र मंडळ

# माय मराठी माझी, परंतु...




काल मराठी भाषा दिवस होता. त्या निमित्ताने बऱ्याच लोकांनी आपल्या भाषेचं कौतुक केलं, काहींनी अश्रू गाळले आणि अनेकांनी दरवर्षी पाठवलेले शुद्ध मराठी शुभेच्छा संदेश (जे त्यांना वर्षातून एकदाच इतके शुद्ध लिहिता येतात) पाठवले, उद्यापासून पुन्हा गाडी गुड मॉर्निंग च्या रुळावर येईल हे माहित असूनही.

काल मी माझ्या कंपनीच्या कार्यालयामध्ये गेलो होतो. तिथे एक मुलगी जी केबिन क्रू, म्हणजे विमान परिचारिका, असलेल्या मुला-मुलींची मॅनेजर आहे, तिच्या जागी बसून काहीतरी काम करत होती.

मी दुसऱ्या एका माणसाशी बोलत असताना तिचा फोन वाजला. तिनी तो फोन घेतला आणि कुठल्यातरी अनोळखी भाषेत ती बोलू लागली, म्हणून मी बोलणं थांबवलं. तिचं बोलणं संपल्यानंतर मी तिला विचारलं, “कुठल्या भाषेत बोलत होतीस?”

“पर्शियन,” ती म्हणाली, “म्हणजे फारसी भाषा.”

“कोणाशी?” मी आश्चर्याने विचारलं.

“माझ्या मुलीशी. माझी मातृभाषा तिला शिकवण्याचा माझा प्रयत्न चालू आहे.”

“अच्छा? किती वर्षांची आहे तुझी मुलगी?”


“नऊ वर्षांची. दुसऱ्या महायुद्धात माझे पणजोबा पुण्यात आले. तेव्हापासून आम्ही इथेच आहोत.”

“अरे वा! कुठल्या कुठल्या भाषा येतात तुला?”

“इंग्रजी, हिंदी, मराठी आणि फारसी.”

“आणि तुझ्या मुलीला?”

“तिलाही या चारी भाषा येतात, पण आम्हा दोघींनाही फारसी बोलता येत असलं तरी लिहिता वाचता येत नाही.” तिच्या चेहऱ्यावर मातृभाषेची कळकळ आणि आता ती भाषा आपल्या कुटुंबात तरी लुप्त होणार याची कळवळ स्पष्ट दिसत होती. मला पुलंचं मराठीच्या प्रेमाबद्दलचं उपहासात्मक विनोदी वाक्य आठवलं. तिथून परत घरी येताना मी टॅक्सी चालकाला जेव्हा गर्दी टाळण्यासाठी उजवीकडे वळायला सांगितलं तेव्हा तो डावीकडे वळला आणि वर मला म्हणाला, “तुम्ही ते लेफ्ट राईट सांगा मला, हे डावं उजवं म्हणजे कन्फ्युज होतं.”




“अच्छा?” मी विचारलं, “कुठले तुम्ही?”

“पुण्याचाच की!”

त्या वेळी मी माझ्या फोनवर बातम्या वाचत होतो. अचानक मला हि बातमी दिसली, आणि माझ्या पोटात गोळा आला.

> **मराठी भाषा दिवस 2024: तारीख आणि इतिहास**
>
> मराठी भाषेच्या समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेला श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस, मराठी भाषा दिन दरवर्षी **27 फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रसिद्ध मराठी कवी, नाटककार आणि कादंबरीकार विष्णू वामन शिरवाडकर** यांच्या जयंतीनिमित्त निवडला जातो , ज्यांना **कुसुमाग्रज** म्हणून ओळखले जाते .

श्रद्धांजली? एका जिवंत भाषेला? मग लक्षात आलं, कि तो लेख इंग्रजीतून गूगलने अनुवादित केलेला होता.हे जरी चुकून झालं असलं तरी गूगलला मराठी शिकवणारा माणूस मराठी भाषिकच असणार ना?

ते बघून मी पूर्वी लिहिलेली एक कविता मला आठवली.

**एक (फेक) वात्रटिका**

१४ ते २७ फेब्रुवारी, व्हॅलेंटाईन डे पासून मराठी दिनापर्यंत...

व्हॅलेंटाईन डेला, त्याच्या डार्लिंगला,
गुलाबाचा बुके, त्याने गिफ्ट केला.

शायनिंग करायला, लाँग राईड मारायला,
सिटीच्या बाहेर, तो तिला घेऊन गेला.

सुंदर सनसेटला, ठेवून साक्षीला,
बुशेसच्या मागे तो, तिच्यासंगे लपला.

सिनेमात पाहिलेले, गाणे त्याने सिंग केले,
आणि ट्यून मधे तिला, ‘लव्ह यू’ सांगितले.

बायसेप्स दाखवत, ‘आय मिस यू’ म्हणत,
त्याने किस मागितला, ओठांचा चंबू करत.

क्षणभर ती शहारली, मग मिस्टीरियसली,
मोनालिसा सारखी, गालातच हसली.

थोडं ब्लश करून, स्टाईलिशली वाकून,
पुढे केला डिम्पलड गाल, तिने डोळे झाकून.

तो फार सॅड झाला, पण तिला पटवायला,
फॅन्सी हॉटेलात, अर्जंटली घेऊन गेला.

खूप कॅन्डल लावल्या, रोमँटिक गप्पा मारल्या,
काजू, चिकन, अन चार बीयर रिचवल्या.

तिच्या फोनची रिंग वाजली, पिकअप करून ती हळूच बोलली,
जेलस फ्रेंड्सचा होता म्हणत, पर्समधे ठेवत खुदकन हसली.

त्यांनी डिस्को डान्स केला, डिनर देखील छान झाला,
अन मनातल्या मनात त्याने, पुढचा प्लॅन आखला.

फादर तिचा पर्मनन्ट अँग्री, सडनली आला हॉटेलच्या दारी,
अन त्याला शिव्या देत तो, तिला घेऊन गेला घरी.

व्हॅलेंटाईन डेच्या सेलीब्रेशनला, तीन हजाराला चुना लागला,
तरीही हा हिरो आपला, बॅचलरच राहिला!

*************************************************************************************

वरील कविता मराठी आहे का इंग्रजी? काही ठिकाणी इंग्रजी शब्दांचा वापर सोपा आणि सोयीस्कर असला, तरी...

कविता हि जरी, मिश्कील अन हसरी,
थोडीशी वात्रट, दिसे वरवरी.

तिच्या खोल अंतरी, दडलीये सारी,
माय मराठीची, कळकळ खरी.

शब्दांचा हा खेळ, त्यात इंग्रजी भेसळ,
साधत नाही त्यात, मराठीचा मेळ.

मराठी माउली, मृदू मायबोली,
हळूहळू ती आहे, लुप्त होत चालली.

इंग्रजी शिकूया, हिंदीतही बोलूया,
पण मराठीचे मोल, नको विसरुया.


भाषा हि आपली, समृद्ध सजलेली,
मग इंग्रजीची कुबडी, तिला का लागली?

रोजच्या रोज करून, मराठीचा खून,
कसा करावा साजरा, मराठी भाषा दिन?

**अविनाश चिकटे** छायाचित्रे: विकिमिडिया
www.avinashchikte.com

## शिवजयंती शब्दकोडे

साहिल आणि विवान शेंडे



उभे शब्द
१.शिवाजीचा जन्म इथे झाला
२.लढायला वापरतात
३.युद्धातले शस्त्र
४.बाजी प्रभू लढले ती जागा
५.शिवाजीचे पुण्यातले घर
६. गड आला पण सिंह गेला तो मित्र

जय शिवाजी महाराज

आडवे शब्द
१.स्वराज्याचे सेनापती
२. शिवाजीचे वडील
३. गड आला पण सिंह गेला तो मित्र
४.अफझलखानाला मारायला हे वापरले
५.किल्ला या शब्दाचा समानार्थी शब्द

साहिल शेंडे (वय १४), विवान शेंडे (वय ११)

# माझे प्रभावशाली वडील

कुटुंबिय मुल्ये, कष्ट, प्रेम, दृष्टी, मराठी बाणा, आणि स्वप्ने — या सर्वांचा केंद्रबिंदु असलेल्या माझ्या वडिलांचे व्यक्तिमत्व आजही माझ्या आयुष्यात खुप प्रभावशाली आहे .

माझ्या वडिलांच्या हातांवरील घट्ट गाठी, शेतावर कामं  करून भाजलेले खरखरीत हात त्यांच्या आयुष्याची कहाणी सांगत.  शेतीत शेंगा फोडण्याचे दिवस आणि गव्हाच्या पोत्यांचे ओझे खांद्यावर उचलण्याची मेहनत. ते मातीशी जोडलेले, निसर्गाशी समरस असलेले एक वडील, आजोबा, एक सामाजिक व्यक्तिमत्व  होते. शेतकरी कुटुंबात जन्मलेले; पण लहानपणापासूनच त्यांच्या मनात आपल्या गावाच्या पलीकडचे मोठे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण करणे सोपे नव्हते. दुर्गम गावात शाळाच नव्हती, त्यामुळे त्यांना आपले सगळे परिचित आयुष्य मागे सोडून दूरच्या नात्यातील काकांकडे जावे लागले. तिथे ते काकांना हवं ते काम करत शिक्षण घेत.  अखेर जेव्हा त्यांनी सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी हातात घेतली, तेव्हा ती केवळ त्यांची यशोगाथा नव्हती, तर चिकाटी आणि समाजाच्या पाठबळाची साक्ष होती. पुढे त्यांनी भारतातील गोदावरी नदीवर भव्य धरणे उभारली—ज्यांची मजबूत रचना त्यांच्या पिढ्यानपिढ्या टिकणाऱ्या वारशाची साक्ष आजही देत आहेत. आजही भारतात गेलो कि मी सहज पणे नासिक, गोदावरी कडे आकर्षणाला जातो.

शिक्षणाने माझ्या वडिलांना त्यांच्या जन्माच्या परिस्थिती पलीकडे जाऊन स्वत:चे आयुष्य घडवण्याची ताकद दिली. आपल्या समुदायातील इतर मुलांसाठीही संधी निर्माण व्हावी, म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले आणि आपल्या कमाईतील प्रत्येक पै अन पै शिष्यवृत्तीसाठी खर्च केली. माझ्या मुलांनाही  त्यांनी तीच  शिकवण दिली आणि निखळ आणि ठाम पाठिंबा दिला. मी उद्योजकतेची माझी दीर्घकालीन स्वप्ने त्नाच्याजवळ व्यक्त केलीत तेव्हा ते त्यांच्या खोडकर हास्यात  म्हणाले— “मोठी स्वप्ने नसतील, तर मोठी प्रगती होणार नाही.”  पण सारखे फक्त वरतीच बघू नकोस  - तुझी मान दुखेल. आपल्या मातीला विसरू नको आणि गरजवंताला मदत करण्यास  दोनदा विचार करू नकोस. त्यांना मी वचन दिले की उच्च शिक्षण घेऊन आणि समाजात दीर्घकालीन बदल घडवून मी त्यांच्या स्वप्नांना आकार देईल आणी त्याच्या शिकवणीस मान देईल.

वयोमाना प्रमाणे त्यांनी हळूहळू आपली स्मृती, ताकद गमावली आणि अखेरीस डिमेन्शियाशी ते लढा हरले.  तेव्हा त्यांनी मागे सोडला तो उदारता आणि आयुष्यभर शिकत राहण्याचा अमूल्य वारसा. माझे कुटुंब माझ्या या वारशाला पुढे नेण्याच्या प्रयत्नांना नेहमीच खंबीर साथ देत आहे. माझे वडील माझ्या मुलांचे ही मोठे प्रेरणास्थान आहेत, आणि त्यांच्या प्रोत्साहनाचे रूपांतर यशस्वी आणि अर्थपूर्ण आयुष्यात करण्याची जिद्द मुलांमध्ये मी पहात आहे.

हाच आपुलकीचा, उच्च शिक्षणाचा, कष्टास समोर जाणारा दृष्टिकोन यातच मराठी पण आहे आणि माणुसकी पण.  ते कृतीत आणि व्यक्तीत आणले होते माझ्या वडिलांनी --- माझ्या मुलांच्या आजोबांनी.

**संदेश मालपुरे**

# वॉटरलिली

**चित्रकार: राजस चित्रे**




हे सुंदर चित्र बनवणारी राजस म्हणते, “सूर्याचा प्रकाश आणि त्याची सावली यांच्या हलक्या खेळाने वॉटरलिलीच्या पाकळ्यांवर आणि तिच्या पानांवर उमटवलेलं मोहक सौंदर्य पाहताना मला हे चित्र बनवण्याची प्रेरणा आली”.

# “आईये मेहरबान, बैठिये जानेजा” ...

थंडीच्या एका सकाळी गच्चीवर पसरलेला निळसर उजेड अजूनही हलकेच थरथरत होता. बंद काचेच्या दारातून बाहेर पाहत असताना अचानक एक ओळखीचा, स्वर कानावर आला. गच्चीत टांगलेल्या बर्डफीडरवर बसलेला टिटमाऊस डोक्यावरच तुरा नाचवत जोरजोरात शीळ घालत होता, जणू माझं लक्ष वेधून घेत म्हणत होता, “खाऊ कधी भरणार आहेस फीडरमधे?”

आमच्या गच्चीत येणाऱ्या पक्ष्यांना एक विशिष्ट मेनूच आवडतो. सूर्यफुलाच्या बिया आणि कच्चे शेंगदाणे. कधीतरी त्यात सुक्या क्रॅनबेरीज असल्या तर त्या मात्र खाली पडलेल्या दिसतात; बहुतेक फारशा पसंत नसाव्यात. मी फीडर भरून ठेवताच काही क्षणांतच गच्चीवर सुमधुर स्वरातल्या लकेरी ऐकू येऊ लागल्या. स्क्रब जेचा खट्याळ आवाज, लांब काळ्या चोचीच्या नटहॅचची चपळ हालचाल, टोही पक्ष्यांची डौलदार नजाकत आणि पिवळ्या फिंच पक्ष्यांची सोनसळी चमक. सगळे मिळून जणू एक छोटासा संगीत सोहळाच रंगवत होते.

त्यांच्यात खारींचा सहभाग तर एकदम दमदार असतो. धुरकट करड्या आणि फिकट तपकिरी रंगांच्या खारी भरगोस शेपटी हलवत गच्चीवर उड्या मारत येतात. कधी एकमेकींच्या मागे धावत पाठशिवणीचा खेळ खेळतात, तर कधी अचानक थांबून कुतूहलाने आजूबाजूला पाहतात. नेहमीप्रमाणे एक खार फीडरवर चक्क चढून बसली आणि मुक्तपणे खाऊचा आस्वाद घेऊ लागली. छोट्या फीडरवर मावणं अवघड असूनही ती सहजपणे कधी उलटी लटकत, कधी शेपटीचा तोल सांभाळत निरनिराळ्या एरोबिक्सच्या करामती करत होती. पुढच्या दोन पायात खाऊ भरून घेऊन इकडे तिकडे टेहळणी करत तिचं खाणं चाललं होतं. तिच्या या







कसरतींमुळे बरेच दाणे खाली सांडत होते आणि त्या सांडलेल्या दाण्यांवर मग तपकिरी टोही पक्ष्यांच्या जोड्या, तसेच अनेक प्रकारच्या चिमण्या आनंदाने ताव मारू लागल्या. गच्चीवरची ही गडबड, हा रंगलेला गोंधळ आणि किलबिल पाहताना मी मंत्रमुग्ध होऊन गेले. नंतर काही वेळानंतर पाहिलं तर पोट तुडुंब भरल्यामुळे ती खार चारी पाय लांब करून शांतपणे काही काळ पालथी पडून राहिली होती. मग आली सुंदर सुतार पक्षांची एक जोडी. आवारातल्या ओक वृक्षांवर सारखं त्यांचं चोचीनं  केलेलं तबलावादन ऐकू येत असतं. लाल भडक डोक्याच्या काळ्या-पांढऱ्या सुतार पक्षांच्या दोन जोड्या आमचे नेहमीचे पाहुणे. ते नेहमीच गडबडीत असतात. भुर्रकन येतात, पटदिशी दाणे टिपतात आणि तितक्याच वेगाने उडून जातात. त्यांच्या हालचालींमध्ये एक विलक्षण डौल आणि सौंदर्य असतं. एक पारव्यांची जोडीही नेहमी दिसते. डौलदार पावले टाकत, टकटक मान हलवत ते शांतपणे खाण्यात मग्न असतात. त्यांच्या त्या स्थिर, निवांत हालचाली गच्चीच्या गोंगाटात एक वेगळीच लय आणतात.





अलीकडे एक नवे पाहुणे आमच्या गच्चीच्या आजूबाजूला दिसू लागले आहेत, लांब शेपूट असलेली, नाजूक तपकिरी रंगाची एक जोडी. कधीच न पाहिलेली ही जोडी झाडांच्या फांद्यांवरून आमच्याकडे कुतूहलाने पाहत असे. गूगलच्या माहितगारांनी त्यांना ब्राउन थ्रॅशर म्हणतात असं सांगितलं. त्यांना आमचा खाऊ आवडतो का नाही कळलं नाही पण मात्र ते बऱ्याचदा झाडावर बसून हजेरी लावतात. बऱ्याचदा राजबिंडा बहिरी ससाणा पण गच्चीच्या कठड्यावर बसून रुबाबदारपणे मोठी शीळ घालतो. आकाशात मुक्तपणे विहरणाऱ्या घारींचेहि सतत दर्शन होत असते.

या रंगीबेरंगी मित्रांना न्याहाळताना त्या दिवशी मनात नकळत एक जुने हिंदी गाणं उमटलं—

"आईये मेहरबान, बैठिये जानेजा..."

जणू हे सगळे पक्षी त्या सुरांवर नाचत माझ्या स्वागताला प्रतिसाद देण्यासाठी गच्चीत येत होते. मी गुणगुणतच त्यांची दाणेटीपी, त्यांची हालचाल, त्यांचे रंग माझ्या फोनमध्ये बंदिस्त करू लागले.

या छोट्या पाहुण्यांमुळे आमची गच्ची रोजच्या आयुष्यातील एक छोटंसं, रंगीबेरंगी उत्सवस्थळ बनते. त्यांच्या हालचाली, त्यांचे रंग, त्यांची गडबड आणि त्यांचं निरागस कुतूहल हे सगळं माझ्या रोजच्या आयुष्यात एक वेगळाच आनंद भरतं. त्यांच्या येण्यानं दिवस उजळतो, त्यांच्या सुरांनी मन हलकं होतं. गच्चीवरचा बागडणारा हा रोजचा मित्रपरिवार मला नेहमी आठवण करून देतो कि छोट्या छोट्या क्षणांतही किती मोठा आनंद दडलेला असतो.





**स्मिता कुलकर्णी**

# अपूर्णांक (खास कलाकारांसाठी)

कलाप्राप्ती साठी करावी लागते खूप साधना
तेव्हाच कलाकाराच्या जीवनाची पूर्ण होते कामना
कलेच्या क्षेत्रात कधीच नसतो पूर्णांक
असतो तो स्वल्पविराम, असतो तो अपूर्णांक
अपूर्णांकातच मजा आहे,असावे कलेसाठी असमाधानी
तेव्हाच कला प्राप्त होते, ही गोष्ट मानावी
अपूर्णांक आणि पूर्णांक, आहेत जवळचे सोबती
पण कलेमध्ये अपूर्णांकच रहावा, तर प्रसन्न होते सरस्वती
कलेचे गणित सोडवतांना ,उत्तर यावे अपूर्णांकात
तरच ओंजळ भरत जाते, थोडे तरी येते हातात
अपूर्णांकाचे उत्तर शोधत, वाट चालावी आजन्माची
पूर्णांकाच्या उत्तरासाठी,
वाट पहावी पुनर्जन्माची.

**सौ. विनया फणसळकर**, नासिक

# समुद्राजवळ फुललेला वसंत

**चित्रकार: राजस चित्रे**



पॅसिफिक समुद्राच्या निळ्या लाटा आणि  त्याच्या किनाऱ्यावर वसंतात बहरलेली फुलांची उधळण या चित्रमागची प्रेरणा आहे असं राजस म्हणते.

# शक्ती- एक शोध, एक आव्हान

२०१९ साली शक्ती सिम्पोजियम चा पहिला कार्यक्रम झाला आणि या वर्षी ११ एप्रिलला, ६ वा कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम स्त्रियांमधील गुण, सामर्थ्य प्रकाशात आणण्यासाठी, स्त्री शक्ती साजरी करण्यासाठी  होता. आपल्या शहरातील कर्तबगार महिलांचे कौतुक करून, त्यांच्या जीवन शैली मधून आणि कार्यातून इतरांना प्रेरणा मिळावी हा पण शक्ती सिम्पोजियम चा उद्देश आहे.

शक्ती ही अमेरिकेतील दक्षिण आशियाई (South Asian) महिलांसाठी मी स्थापन केलेली non profit सामाजिक संस्था आहे. माझे आणि माझ्या आसपासच्या महिलांचे अनुभव आणि आम्ही एका विशिष्ट हेतूने एकत्र येणाऱ्याची गरज ही शक्ती च्या मागची प्रेरणा. शक्ती हे माझे passion project आहे.
शक्ती ची संकल्पना ही थोडीशी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या चालीवर आहे.  स्त्रियांनी/ महिलांनी एकत्र येऊन स्वतःच्या आणि समाजाच्या उन्नतीसाठी योगदान करावे, ते करत असताना एकमेकींना साथ देत प्रोत्साहन द्यावे, उभ्या केलेल्या कामाचे कौतुक करावे,  आणि त्यातून नवनवीन कल्पना आणि उपक्रम पुढे यावेत असा मानस आहे.

गेल्या ७ वर्षांत शक्ती ला छान आकार आला आहे. आता शक्तीच्या सदस्यांच्या सहकार्याने वाचन गट (book क्लब)आणि crochet club चालू केला आहे. शिवाय स्वयंसेवा उपक्रम, स्त्रियांशी निगडित विषयांवर चर्चा असेही उपक्रम चालू आहेत.

एकमेकांपासून प्रेरणा घेऊन, नवीन नाती जोडून, पाठीवर मोठी शाबासकीची थाप आणि प्रेमाने हातात हात  देऊन सगळ्यांनीच यशस्वी वाटचाल करण्याची ही शक्ती!

माहिती साठी संपर्क- अमिता खरे ९१६-८३५-२६४८

**या वर्षीच्या पाहुण्या; पवनी जैडका, नोरीन हअक़-कॉलॉबे आणि प्रिया वेंकटेशन सोबत**






## उत्साही श्रोता समूह






**प्रस्तावना:** बेडूक विहिरीत राहतात पण तिथेच त्यांचे विश्व. ना बाहेर पडण्याची वृत्ती, ना कष्ट. “कुपमन्डूक” हा शब्द किंवा “कुपमन्डूक वृत्ती” व्याख्या ह्यावरूनच रूढ झाली. मंडूक म्हणजे बेडूक. अशा वृत्तीचे फक्त बेडूकच असतात असे नाही, तर काही माणसे देखील असतात. ना त्यांना प्रगतीची स्वप्ने, ना प्रयत्न करतात. पण ही वृत्ती त्यांनी सोडली पाहिजे. खालील कविता अशाच “कुपमन्डूकाला” उद्देशून आहे आणि जणू मी विचारत आहे कि कसे प्रयत्न करशील व त्यासाठी माणसं तुझी तयारी आहे का!

# कुपमन्डूका, आहे का तुझी तयारी?

**अजित नातू**

विहिरीत कवतिक, धन्य मानणारे तुम्ही मंडूकी
थोडे श्रम करा, जरा मान उंच करून बघा की

सात समुद्राला पार करणे तर जाउदे की
बाहेरील एका लाटेवर तरी आरूढ व्हा की

अहो निदान तशी थोडी स्वप्ने तरी बघा की
तेच तेच रहाट गाडगे कवटाळत बसाल दिवस किती

विहिरीतून चंद्र 'फक्त' दिसतो, नाही लागत हाती
पकडायचे जर तेज सूर्याचे, तर बाहेर तरी पड की

डबक्यातल्या बेडकांवर वरचढ, ही नाही यशाची सिद्धी
बाहेरील खारीचे प्रयत्नच सेतु बांधतात, हे मर्म जाण की

काय म्हणतोस? त्या गोतावळ्यातून बाहेर कसा येऊ की
अरे, त्या रहाट गाडग्यात चढ, ये वर अन बाहेर उडी घे की

होय, खरचटेल कदाच तोडताना, हे आत्मसंतुष्ट वर्तुळ की
अरे मानवा, नव्याला जन्म देताना, आईसुद्धा रक्ताळतेच की

इतिहासातले ‘सूर्य’ बसल्या जागी नाही अवचित उगवले की
(जग)रहाट तोडण्याचे, स्वप्न बघण्याचे धाडस त्यांनी केले की


इतिहास घडतो केंव्हा, जेंव्हा होते विहिरीची वाहती नदी की
प्रश्न असा बेडका, तुझ्यात इच्छा, अस्मिता आहे का नाही!


# क्षण टिपलेले, शब्दांत उलगडलेले

**शशांक जोशी**







निष्पर्ण चाफ्याचा, कायापालट झाला
नवीन ताज्या पालवीचा, थवा उतरला
फुलपाखरेच जणु टेकली टोका टोकाशी
चमकीले पंख हिरवे, निळ्या आकाशी
Shashank


जोडी झाडावर ओल्ड गोल्ड
देई संदेश व्हा सॉलीड बोल्ड
वेळ येता, पडायचय गळून
तोवर आनंदे, घ्याकी जगून!
Shashank

# माउंट फुजीवरचा वसंत ऋतू

**चित्रकार: राजस चित्रे**

काही वर्षांपूर्वी जपानला गेलेल्या चित्रकार राजसला माउंट फुजीचं दर्शन घेण्याची मनापासून इच्छा होती. पण त्या दिवशी दाट धुके आणि ढगांच्या पांघरूणामागे हा भव्य पर्वत जणू लपूनच बसला होता. प्रवासातून परतल्यावर न पाहिलेल्या त्या पर्वताची ओढ तिच्या मनात खोलवर रेंगाळत राहिली. आणि मग तिने ठरवलं, ज्याला डोळ्यांनी पाहू शकले नाही, त्या माउंट फुजीला मी माझ्या कुंचल्याच्या स्पर्शातून कॅनव्हासवर उमलवून पाहणार.



# वाचाल तर वाचाल!!

# मराठी मंडळ सॅक्रामेंटो ग्रंथालय

**नमस्कार मंडळी,**

परदेशी राहात असताना आपल्याला मायभूमीतील कितीतरी गोष्टींची आठवण येते. मग बरेचदा आपण जेव्हा मायदेशी जातो तेव्हा त्या घेऊन येतो. आणि आता तर “कॅलिफोर्नियाचा कोकण” झाल्यापासून इथे अगदी कुळथाच्या पिठापासून , कडव्या वालापर्यंत तसंच पु ना गाडगीळांच्या दागिन्यांपासून ते पैठणीपर्यंत काय मिळत नाही? खरयं न! पण अजूनही एक गोष्ट मात्र आहे जी सहजासहजी इथे मिळत नाही ती म्हणजे **“मराठी पुस्तकं”!!** मराठी माणूस आणि पुस्तकांचं अगदी घट्ट नातं आहे. मराठी मध्ये जसे अनेक प्रगल्भ साहित्यिक आहेत , होऊन गेलेत तसेच वाचकही प्रगल्भ आणि चोखंदळ आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या सॅक्रामेंटोमधील मराठी पुस्तकप्रेमींना आपले एक खास मराठी पुस्तकांचे ग्रंथालय असावे असे वाटत होते. आणि तीच कल्पना आता लवकरच आम्ही सत्यात उतरवत आहोत. यावर्षी आपण आपल्या ग्रंथालयाची सुरुवात करत आहोत. सध्यातरी अजून पुस्तकं गोळा करणे या टप्प्यात आपण आहोत. पण लवकरच याबद्दलची सगळी माहिती तुमच्यापर्यँत कळवण्यात येईल.

तूर्तास , तुमच्यापैकी कुणाकडे काही मराठी पुस्तके असल्यास आणि आपण ती ग्रंथालयास देऊ इच्छित असल्यास आमच्याशी जरूर संपर्क साधा. किंवा तुम्ही मायदेशी भेटीसाठी जात असाल तर आपल्या ग्रंथालयासाठी २ पुस्तके नक्कीच घेऊन येऊ शकता. तुम्हा सर्वांच्या योगदानामुळे आपले ग्रंथालय उभे राहाणार आहे. आपल्याला आपल्या पालक, गुरुजनांकडून मिळालेला हा वाचनवसा आपण इथे परदेशातही पुढे चालवू आणि आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोचवू!


यासंदर्भात तुम्हाला काही प्रश्न/ शंका/सूचना असल्यास नक्की कळवा!

संपर्क :

**मीनल जोशी**

meenaljo29@gmail.com

भ्रमणध्वनी क्रमांक : ८०२-७३४-३८९३



# क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम: हसत टोचणारा सुखद अनुभव

मी फारसे चित्रपट बघत नाही. अनेक लोकांनी कौतुक केलं असल्याशिवाय नक्कीच नाही. पण ह्या चित्रपटाचे शीर्षक, 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' वाचताच मला स्वतःहून हा बघावासा वाटला.



तसंही कलाकार सगळे ओळखीचे, म्हणजे नाटकांच्या जाहिरातीत लिहितात तसे 'नेहमीचेच यशस्वी!'

चित्रपट सुरू होताच लेखक-दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी स्वतःचं नाव 'ढोम्या' असं लिहिलेलं पाहिलं. ते वाचताच लहानपणीच्या आठवणींनी उसळ मारली, मला खळखळून हसू आलं आणि त्या क्षणीच त्या सिनेमाला आणि लेखक-दिग्दर्शकाला माझी पहिली उत्स्फूर्त दाद गेली.

शाळेत मीही 'चिकट्या' होतो. वायुसेनेत गेल्यावर ते नाव हळूहळू गायब झालं, पण गंमत म्हणजे वयाच्या पासष्ठाव्या वर्षीदेखील अधूनमधून अजूनही 'अव्या' अशी हाक ऐकू येतेच. हा आहे एक साधाभोळा चित्रपट, जो तुम्हाला कधी खुदकन हसवतो, कधी खिन्न करतो, कुठेतरी हलकेच चिमटा काढतो, आणि खूप विचार मात्र नक्कीच करायला लावतो.
वरवर पाहिलं तर ही एक मराठी शाळा वाचवण्याची कहाणी आहे. पण थोडं खोलात गेलं, तर जाणवतं की मराठी भाषा वाचवण्याची ही धडपड आहे.



मराठी वाचवायची असेल तर मराठी माध्यमाच्या शाळेतच गेलं पाहिजे का, यावर वाद होऊ शकतो. चर्चासत्रं होतील, परिसंवाद होतील, व्हॉट्सॲपवर दीडशे संदेश देखील येतील.

पण मराठी भाषा टिकली पाहिजे यावर मात्र वाद घालायची काहीच गरज नाही. या चित्रपटाचं सगळ्यात सुंदर वैशिष्ट्य म्हणजे इथे एकच नायक नायिका किवा खलनायक नाही. अनेक दिग्गज कलाकार आपला ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटवून जातात, कारण प्रत्येक पात्र आपापल्या परीने अलौकिक आणि अपरिहार्य आहे. साईराज केंद्रे हा बाल कलाकार देखील छोट्याशाच भूमिकेत त्याची अविस्मरणीय अशी छाप सोडून जातो.




कोकणातली हिरवाई आणि समुद्राच्या पार्श्वभूमीवर चितारलेल्या ह्या कहाणीत खऱ्या नायिका आहेत त्या म्हणजे ती दगडी मराठी शाळा, आणि त्यामागे अदृश्य असूनही सर्वव्यापी अशी आपली मराठी मायबोली.

आणि खलनायक आहे ते आपले मराठी बद्दलचे औदासीन्य.

आता भाषेचा विषय निघालाच आहे, तर एक कबुली. इंग्रजी भाषेचा निर्घुण खून करणारे मी अनेक पाहिले आहेत, आणि एकेकाळी मीही त्यात कळत नकळत सहभागी झालो आहे.
आपले मराठी लोक हिंदी भाषेलाही धोबीपछाड करून चितपट करताना मी पाहिलेलं आहे.

मला आठवतं, शाळेत पहिल्यांदा हिंदीचा धडा वाचला, ज्यात एक मुलगा आपल्या घराबद्दल सांगत असताना म्हणतो, "ये है हमारा सोने का कमरा!"
तेव्हा मी दचकलो. म्हटलं, अरे बापरे! ह्यांच्या घरात चक्क सोन्याची खोली आहे? नंतर कळलं, तो झोपण्याच्या खोलीबद्दल सांगत होता. पाचवी इयत्तेत मी इंग्रजी माध्यम असलेल्या सैनिक शाळेत गेलो अन त्यावेळी इंग्रजीमुळे झालेली माझी त्रेधातिरपीट तर विचारूच नका.

मोठ्या उत्साहात, वडिलांच्या आग्रहाखातर, मी त्यांना माझं पहिलं इंग्रजीत लिहिलेलं पत्र कॉन्व्हेंटमध्ये शिकून आलेल्या मित्राच्या मदतीने लिहिलं. त्या शहाण्याने Dear Father चं स्पेलिंग मला Deer Fater असं सांगितलं. मला काहीच कळत नसल्याने मी तसंच लिहून पाठवलं.




माझ्या वडिलांनी काय करावं? त्यांनी ते पोस्टकार्ड सगळ्या चुकांना लाल शाईच्या पेननी वर्तुळे मारून, पाकिटात घालून मला परत पाठवलं, आणि अलगदपणे मला प्रोत्साहित केलं.
आज मला वायुसेनेतल्या नोकरीमुळे मराठी, हिंदी आणि इंग्रजी, तिन्ही भाषा बऱ्यापैकी येतात. बंगालीत गोड बोलता येतं आणि पंजाबीत शिव्या देखील देता येतात. पण मराठी बोलताना आणि ऐकताना जो सुखद अनुभव येतो — म्हणजे लहानपणी आईच्या मांडीवर झोपल्यासारखा — तो दुसऱ्या कुठल्याच भाषेत येत नाही हो.
म्हणूनच, मातृभाषेबद्दल थोडा आदर असेल, थोडं जरी प्रेम असेल, तर नेहेमीच्या त्याच त्याच विषयांवर बनणाऱ्या हिंदी चित्रपटांना बाजूला सारून 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' हा चित्रपट नक्की पहा.
माझ्या आलं तसं तुमच्याही डोळ्यात पाणी येईल.
आणि पु. ल. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे, तुमचीही अशी परिस्थिती असेल तर हा सिनेमा आवर्जून पहा.
म्हणजे यू मस्टच वॉच इट हं!
तुम्हारे अंग पे काटा आ जायेंगा!

**अविनाश चिकटे**
www.avinashchikte.com

छायाचित्रे: imdb.com

आमच्या सर्व प्रायोजकांचे त्यांच्या उदारआणि सातत्यपूर्ण पाठिंब्यासाठी मनापासून आभार.

## PLATINUM SPONSORS

CHICAGO PIZZA

Sanskrit new age indian

Mantra Vegan & vegetarian

## GOLD SPONSORS




Munee Patel

## Website and Digital Media Sponsor

Digital Factory 24

©MMSAC 2026. MMSAC is a 510 (c)(3) non-profit organization. EIN: 26-4515651